International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.4 Mar-Apr - 2022

# नरहर कुरुंदकरांचे महाभारत विषयक लेखन : एक ऐतिहासिक विश्लेषण

**डॉ. क्षीरसागर बी. एस.**
इतिहास विभाग प्रमुख शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
ई-मेल-drkbs003@gmail.com

**प्रस्तावना**

एक इतिहास विवेचक म्हणून नरहर कुरुंदकर सर्व महाराष्ट्रात ज्ञात आहेत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या विचारशैलीने डोकावले आहे. त्यांचे व्यक्तिमत्व हे बहुआयामी आहे. वाचन-चिंतन-मनन हा कुरुंदकरांच्या जीवननिष्ठांचा भाग होता. त्यांच्या बुध्दीचा पल्ला फार मोठा होता. परंपरेत जे जीवनसंवर्धक असेल त्यांचा स्विकार आणि जे जीवनरोधक असेल त्याचा विरोध हे त्यांच्या वागण्या-बोलण्याचे कायमचे सुत्र राहिले. लहानपणापासुनच त्यांना भारतीय संस्कृती, इतिहास, धर्म, साहित्य इत्यादी विषयाचे ज्ञान होते. त्याचबरोबर वेद, पुराणे, आस्तिक ग्रंथ, नास्तिक ग्रंथ यांचेही त्यांनी वाचन केले होते. इतिहास हे नरहर कुरुंदकरांच्या आवडीचे ज्ञानक्षेत्र ते प्रतिभा निकेतन विद्यालय नांदेड येथे शिक्षक म्हणून आठवीच्या वर्गाला इतिहास शिकवित असत. या तासाला जाहिर व्याख्यानानेच स्वरुप प्राप्त होत होते. इतिहास हा कुरुंकरांचा वस्तुनिष्ठ अभ्यासाचा भाम होता. त्यांनी इतिहासाचा वृथा अभिमान किंवा परंपरांचे उदात्तीकरण, अनुकरण या गोष्टींना कधीच महत्व दिले नाही. तर न्याय-अन्यायाचा निवाडा करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात विशेषत्वाने आढळते. कल्पनारंजकतेला ते ताज्य ठरवितात. विश्वेश्वर कानोळे यांचे इतिहास संशोधन कार्य अक्षरबध्द व्हावे यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केले. सत्यशोधन ही एकच देवता इतिहासाला असते. हे मानणारे ते इतिहासाचे सच्चे पाईक होते. सर्वगुणसंपन्न असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. नरहर कुरुंदकरांच्या चिंतनविषयामध्ये महाभारताचा क्रमांक वरचा लागतो. महाभारतातील कृष्ण, भीष्म, गांधारी, कर्ण, ययाती, शकुंतला व दुष्यंत यांचे पात्र ऐतिहासिक दृष्टया कशा प्रकारची आहेत व लोकमानसात ती कशाप्रकारे प्रसिध्द झालेली आहे, यावर त्यांनी चर्चा केली आहे.

'महाभारत' हा ग्रंथ पाचवा वदे, ऐतिहासिक ग्रंथ मानले जाते. असे असले तरी महाभारतातील अनेक बाबीसंबंधी मतभेद समोर आलेले आहे. महाभारतामध्ये कल्पना, अतिशयोक्तीचे प्रमाण जास्त असल्यामुळे, महाभारताच्या युध्दासंबंधी, मुळ कथेसंबंधी अनेक वाद आहेत. याबाबतचा वस्तूनिष्ठ दृष्टीकोन कुरुंदकरांनी समोर आणण्याचा मूलगामी प्रयत्न केलेले आहे.

महाभारत हे भारतीयांचे राष्ट्रीय महाकाव्य, संस्कृतीचे सार आहे. महाभारत हा असा ग्रंथ आहे. ज्यामध्ये सतत प्रक्षेप होत गेले आहेत. याचे सतत भान ठेवावे व या ग्रंथाची व्यापक पध्दतीने चर्चा व्हावी असा कुरुंदकरांचा आग्रह आहे. महाभारताच्या कालखंड निश्चिती संदर्भात अनेक गुंतागूंत आहे. परंतू ती आपण समजून घेतली पाहिजे. असा वेगळा विचार ते मांडतात. महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीच्या सिध्दीने प्रक्षिप्त ठरवला गेलेला भाग इ.स. 1000 नंतरच्या सांस्कृतिने इतिहासाच्या चिंतनाची सामुग्री आहे.[1] हा नविन विचार त्यांनी महाभारताच्या अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांपुढें ठेवला. महाभारतात जे-जे आहे ते प्राचीन नव्हे. तर त्यातील इ.स. 1000 नंतरचा भाग आहे. महाभारताला चिकित्सक आवृत्तीत मोक्षशास्त्र, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, व्यवहारशास्त्र, पाचवा वदे, इतिहास म्हटले आहे. काव्य ही म्हटले आहे.

म्हणजे कल्पनेच्या विलासाबरोबर परंपरेने चालत आलेला इतिहासही यामध्ये संग्रहित झालेला आहे.[2] यावरुन महाभारत म्हणजे संपूर्णत: इतिहास ग्रंथ नसून त्याचे स्वरुप समिश्र आहे. हे कुरुंदकरांचे मत ऐतिहासिकदृष्टया महत्वाचे आहे. महाभारताचे कथानक गौत्तम बुध्दाच्या पूर्वी काही शतके अस्तीत्वात होते. तरी त्याकाळी आजचे महाभारत अस्तित्वात होते असेही ठरत नाही. आणि महाभारत कथा ऐतिहासिक कथा आहे असेही ठरत नाही. हे खरे महाभारताचे ऐतिहासिक स्वरुप कुरुंदकर आपल्या लिखानातून स्पष्ट करतात. महाभारतात विध प्रक्षेप कसे होत गेले. या क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. सांकलिया, डॉ. बी.बी. लाल, श्री सुखटणकर, भिक्षू उत्तम बोधी आदींच्या मताचा आढावा घेत तर्कसंगत विश्लेषणाचे संदर्भ देऊन कुरुंदकरांनी आपली मते मांडली आहेत. आजच्या स्वरुपात या कथानकात कल्पनेचा आणि श्रध्देचा पसारा खुप आहे. ऐतिहासिक सत्याचा भाग तुलनेने कमी आहे. कुरुंदकर नोंदवितात कि, महाभारताचे स्वरुप हे थोडेशे काव्य, थोडीशी श्रध्दा, खुपशी अतिशयोक्ती, थोडेसे ऐतिहासिक सत्य आहे.[3] म्हणजे सगळेच संत वाङ:मय समजून घेतांना आपण हे तारतम्य बाळगले पाहिजे. हा त्यांचा दृष्टीकोण इतिहासकाराला साजेसा असा आहे. कारण आजच्या महाभारतातील संख्या, रथ व लोखंडाचे वर्णन या सर्व बाबी उत्तरकालीन प्रक्षेप, पुनर्लेखन आणि कविकल्पना यांचा भाग आहेत. यावर कुणाचाच वाद नाही. हे जर खरे असेल तर ज्या कथेत उत्तरकालीन लोखंड आले. यामुळे कथा जून्या काळी लोखंड नाही. म्हणून अस्तीत्वात नव्हती, यात कोणती शास्त्रीयता आहे. अशा खंडण-मंडण पध्दतीने कुरुंदकर एखादा मुद्दा प्रभाविपणे ठसवितांना दिसतात.

महाभारत एक सुडाचा प्रवास दाजी पणशीकर यांचा ग्रंथ. या ग्रंथात पणशीकरांनी सुडाला प्रमुख स्थान दिले आहे. महाभारतामध्ये एका पिढीतून दुसऱ्या पिढीत, दुसऱ्या पिढीतून पूढच्या पिढीत तत्वज्ञान झिरपण्याऐवजी एकच स्त्रोत वाहतो आहे. आणि तो म्हणजे 'सूड'. तो प्रवाह आहे व्देषाचा, मत्सराचा[4] म्हणजे संपूर्ण महाभारतावर सुडाचा जास्त प्रभाव आहे, या ग्रंथाला 41 पानी प्रस्तावना नरहर कुरुंदकरांनी लिहिली आहेत. या प्रस्तानवनेद्वारे कुरुंदकरांनी पणशीकरांच्या ग्रंथाचे मार्मिक मुल्यांकन केले आहे. कुरुंदकरांनी प्रस्तावनेतून स्पष्ट केले कि, दाजी पणशीकरांनी प्रस्तूत ग्रंथाकडे ऐतिहासिक चिकित्सेच्या दृष्टीने पाहिले नाही तर त्याचा अभ्यास हा परंपरागत पध्दतीचा आहे. म्हणजे ऐतिहासिक प्रश्न दाजी पणशीकरांना माहित नाही, याकडे ते लक्ष वेधतात. याशिवाय शाप, वर, अवतार कल्पना, परशुराम कथा, सुडाच्या भावना ह्या सर्व कल्पनांना इतिहासात स्थान नसल्याने त्यास कुरुंदकर गौण स्थान देतात. तर महाभारतामध्ये सर्वथा सुडच दिसतो असे नाही, तर राजकीय हालचालीतून हे युध्द झाले व तो एक प्राचीन इतिहास असावा असेच दिसते. हे त्यांचे विवेचन वस्तुनिष्ठ स्वरुपाचे आहे. नरहर कुरुंदकरांनी महाभारत या ग्रंथावर विविध पैलूंतून प्रकाश टाकला आहे. महाभारत हे व्यासांचे विलक्षण वैभवशाली शिल्प आहे. ते एक राष्ट्रीय संचित[5] आहे. महाभारतातील विविध पात्रासंबंधी सुडांची भावना केंद्रभूत धरुन व्यक्तींच्या परस्परसंबंधीची परस्परसंबंधी संगती लावता येते, परंतू ती निर्दोष व निरपवाद नाही. तसेच धर्मस्थापना हेही महाभारताचे एक सुत्र आहे. अशा अनेक मर्मग्राही विश्लेषण शक्तीचे मनमोहक अविष्कार नरहर कुरुंदकरांच्या महाभारत विषयक लेखनातून दिसून येते.

कुरुंदकरांचे महाभारतातील व्यक्ति-पात्र विषयक लेखन हे बुध्दीवादी कसोटीवर आधारीत असे आहे. ययाती, शकुंतल, दुष्यंत, कृष्ण, गांधारी, कर्ण, भिष्य, यांचे लोकमानसातील चित्र व वास्तविक चित्र काय याचे मार्मिक विश्लेषण केले आहे. नरहर कुरुंदरांनी महाराष्ट्र टाईम्स खांडेकर विश्लेषकांमध्ये ययातिच्या निमित्ताने या आशयाचा लेख लिहिला. त्यामधून खांडेकरांनी लिहिलेल्या कादंबरीचे वास्तविक रुप स्पष्ट

करतांना त्यातील गुण-दोष त्यांनी स्पष्ट नोंदविले आहे. खांडेकरांनी ययाती भोगलुलूप ' स्त्रिलंपट ' असा रंगविला, कुरुंदकर नोंदवितात. खांडेकरांनी ययाती ही कचाची जयगाथा असल्याचे भासविले आहे. ययातीचा अंतिम नायक कच आहे.[6] ययातीला महत्व दिल्यापेक्षा खांडेकर कचाला ययाती या कादंबरीमध्ये महत्व देतांना दिसतात. खांडेकरांची ययाती ही अशी आधूनिक माणसाच्या नव्या आकांक्षाची कथा आहे. ती महाभारतातील ययातिची कथा नव्हे परंपरेची पुराणकथाही नव्हे.[7] आजपर्यंत आपण ययातीस भोगाचा प्रतिनिधी समजून आलो. परंतू यास महाभारतामध्ये कोणताही आधार नाही. ययाती संदर्भात आलेली सर्व कथानके पुराणामधून आलेली आहेत. ती खोटी, बनावट व उत्तरकालीन असतील परंतू लोकमानस ह्याच पध्दतीने ययातीकडे पाहते. याचे खंडण करतांना ययातीचा भोगलुलूपणाचा समदृष्टीस येणे हाच ययातिचे दुर्देव आहे. हा वेगळा विचार ते मांडतात.

खांडेकरांचा ययाति वेगळा व मुळ इतिहासात वेगळा. इतिहासात ययाति हा कुरुवंशातील राजा होय. तो अत्यंत विद्वान, शहाणा, वेदज्ञ, यज्ञकर्ता होता, मोक्षविज्ञेचा जाणता, अध्यात्म्याचा जाणता, प्रजाहितदक्ष राजा. असे इतिहासातील ययातीचे व्यक्तीमत्व आहे. ययातीने देवयानीसोबत लग्न केल्यानंतर शर्मिष्ठेशी प्रेम का करावे हाच प्रश्न खांडेकरांनी कादंबरीत मांडला आहे. या प्रश्नाला उत्तर कुरुंदकरांनी दिले आहे. लंपटपणा स्त्रियांच्या संख्येवर अवलंबून नाही. तर पुरुष स्त्रीच्या किती आहारी जातो. मग त्या बाईला नाराज करण्याची हिंमत नसल्याने स्वत:ला न पटणाऱ्या गोष्टी करायला लागतो. हा लंपटपणाचा भाग आहे.[8] कारण लंपटपणा हा संख्येवर अवलंबून नसून व्यक्तीच्या आचरणावर अवलंबून असतो. या दृष्टीने शंतनू, दशरथ, दिर्घतमस, ऋषी च्यवन हे लंपटपणाचे प्रतिनिधी वाटतात. ययाती नव्हे, राज्यकर्त्यांच्या संदर्भातील ‘भोग’ हा केवळ कामसुख नसून प्रजाकल्याण असतो. ययातीने राजा या नात्याने सर्व जबाबदाऱ्या पार पाडून ‘अर्थभोग’ पूर्ण केला. असा वेगळा अर्थ ‘भोग’ या शब्दांचा करुंदकर लावतात. व ययाती ही एक पुण्यवान सम्राटाची कहानी असल्याचे नोंवितात. यामुळे ययातिस भोगलपन म्हणता येत नाही. या काळात ययाती धर्मपूर्वक प्रज्ञानूरंजन करित होता. त्याचे विश्वपालन म्हणजे प्रदेशरक्षण केले. चोरांचा बंदोबस्त केला. युध्दे जिंकली, राज्य वैभवाला नेले, दीनांवर अनुग्रह केला. अतिथी पालन केले. यज्ञ केले, देवतांचे तर्पण कले व श्राध्द करुन पितरांचेही तर्पण केले. धर्मपुरुषार्थही पूर्ण केला.[9] म्हणजे याही काळात ययाति स्त्रिलंपट नव्हता. पुढे ययातीने पुरुला राज्य देऊन तो देवयानी व शर्मिष्ठेसह तपासाठी सर्वत्याग करुन बाहेर पडला. कामाने काम तृप्त होत नाही, हे सत्य त्यास ज्ञात होते. कुरुंदकरांनी ययातीचे वस्तुनिष्ठ ऐतिहासिक पात्र समोर आनले. ययातीच्या वास्तविक व्यक्तिमत्वावर त्यांनी टाकलेला प्रकाश महत्वाचा आहे. कुरुंदकर ययातीकडे प्रजाहितदक्ष राजा या ऐतिहासिक दृष्टीने पाहतात.

लोकमानसात भीष्म हा ‘भिष्म प्रतिज्ञेसाठी’ प्रसिध्द आहे. याशिवाय भीष्म हे महाभारतातील अत्यंत निष्कलंक, वैराग्यशाली, प्रतिज्ञारुढ व्यक्तीमत्व असे लोकमानस मानते. नरहर कुरुंदकरांनी भीष्मविषयीचे सविस्तर विवेचन ‘भीष्म एक चिंतन’ या लेखातून केले आहेत.

भीष्म हा राजा शंतनूचा मुलगा पितृभक्तीसाठी राज्याचा त्याग करणारा, राजत्याग आणि आमरण ब्रम्हचर्याची प्रतिज्ञा करणारा, एक वृतस्थ, तपस्वी, साधूपुरुष असे भीष्माचे व्यक्तीमत्व लोकमानसात आजही आहे. तर महाभारतामध्ये शांती आणि अनुशासन पर्वाचा वक्ता भीष्म आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष पुरुषार्थांशी संबंधीत असणाऱ्या इहलोकवादी. ज्ञानाचा नेता व श्रेष्ठ ज्ञानी अशी भीस्माचा प्रतिमा आहे.

भिष्माचे संस्कृतीने आणि परंपरेने लोकमानसातील उभे केलेले प्रतिबिंब म्हणजे महापराक्रमी, धनुर्धरांचा अग्रणी, महानपराक्रमी, इंद्राप्रमाणे बाणांचा पाऊस पडून शत्रुचा फडसा पाडणारा, असे असले तरी स्थुलमानाने लोकमानसातील चित्र व महाभारतातील चित्र यामध्ये फरक दिसून येतो. भिष्माने पितृभक्तीसाठी दोन प्रतिज्ञा घेतल्या हा भिष्माचा निर्णय योग्य नव्हता. उलट भीष्माने आपल्या पित्याला चूकांपासून वाचवायला पाहिजे होते. जसे राम-दशरथ यांचे वर्तन तसे भिष्म-शंतनूचे दिसत नाही. कामसुखासाठी मुलाच्या आयुष्याचा सत्यानाश करणा-या बापांपैकी शंतन एक बाप आहे.[10] संस्कृतीने, लोकमानसाने उभ्या केलेल्या भीष्माकडे आपण सतत पाहत आलो आहे. भिष्माकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहावे. याकडे कुरुंदकर प्रामुख्याने लक्ष वेधतात. भीष्म ही फार मोठी विभूती आहे. असे लोकमानस मानते. परंतू कुरुंदकर हे प्रत्येक व्यक्तीमत्वाचे मूल्यमापन पध्दतीने स्थान स्विकारणारे विचारवंत. तेव्हा भीष्माचे स्थान ही त्यांनी त्याच पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. महाभारतामध्ये भीष्माने अनेक चूका केल्या. त्यास कुरुंदकर ऐतिहासिक दृष्टीने पृष्ठी देतात. रामायनात जसा राम वागला तसा महाभारतात भीष्म वागल्याचे दिसत नाही. पित्याला प्रमादापासून वाचवित नाही. तो वेळेवर चूकीचे निर्णय घेऊ लागतो. यामुळेच तो पराक्रमी असूनही त्याला प्रत्येक मोठ्या प्रश्नात अपयश आलेले आहे. भिष्माचे सर्व जीवन चुकीचे निर्णय घेण्यात व अपयशी होण्यात गेलेले आहे. राजकारभाराच्या जबाबदारीमुळे भीष्माला भावांचे पालण-पोषण चांगल्या प्रकारे करता आले नाही.[11] भिष्माने असंख्य चूका केल्या. त्यामुळेच महाभारताचे युध्द झाले. काहींनी भीष्माला शापित वसू म्हटले आहे. वशिष्ठांच्या शापामुळे भीष्माला मृत्यूलोकी जन्म प्राप्त झाला होता. वसू हे महातेजस्वी देव होते.[12] असे ‘महाभारताची शापवाणी’ या भिडे यांच्या ग्रंथातून सिध्द होते. भीष्मशापीत असल्याने अपयशी झाला. अशी लोकमानसात भीष्माची प्रतिमा आहे. परंतू नरहर कुरुंदकरांनी भीष्म विषयक केलेले विवेचन हे गुण व दोषांचे असे आहे.

भीष्माच्या चूकांमुळेच महाभारताचे युध्द झाले यावरही ते प्रकाश पाडतात. याशिवाय मानवी बुध्दीला फार मोठ्या मर्यादा असतात. घडलेले समजणे-उमजणे हे एका मर्यादेपर्यंत शक्य आहे. परंतू त्यापूढे शक्य नाही. भीष्माला समजून घेतांनी हाच धागा घठ्ठ धरावा लागतो. कुरुंदकरांनी आपल्या विवेचनातून ऐतिहासिक भीष्माचे स्थान स्पष्ट केल्याने महाभारतकालीन इतिहास लेखनात कुरुंदकरांच्या विवेचनास महत्वाचे स्थान प्राप्त होते.

भारतीय संस्कृती, पूराण, महाभारत, भगवदगीता, उपनिषद व ऋषमुनींच्या चरीत्रातून कृष्णाचे आगळे-वेगळे चित्र उभे राहते. कृष्ण एक खोडसर, लबाडी करणारा, गोकुळचा चोर, व्यभिचारी अशा अनेक वाईट प्रवत्तीबरोबरच कृष्ण एक अध्यात्म साधना, नैतिक साधना, स्वातंत्र्याची साधना, वैराग्य, गीतेचा प्रवक्ताही लोकमानसात कृष्णच आहे. नरहर कुरुंदकर मात्र कृष्णाकडे राष्ट्रनिर्माता, गणतंत्राचा अग्रणी या दृष्टीने पाहतात. कृष्णाने कशा पध्दतीने नवीन राष्ट्रांची उभारणी केली. पांडवांचाच का तो पक्षकार झाला. कौरवाचा का नाही, यासंबधीचे मर्मग्राही विवेचन सर्व लोक मानसात विविध रुपात-स्वरुपात प्रसिध्द असलेला कृष्ण विषयक लेखनातून रेखाटले आहे.

श्रीकृष्ण हा आपल्या संस्कृतीचा, धर्माचा, परंपरेचा आधार असला तरी, श्रीकृष्ण संबंधित ज्या सर्व गोष्टी सांगितल्या जातात. त्या सगळयाच इतिहासामध्ये घडल्या असेल असे खात्रीशीर म्हणता येत नाही. कृष्णचरित्र हे केवळ काव्य नसून कृष्णचरित्राला इतिहासाचा आधार आहे.[13] प्रतिकुल परिस्थितीत जुन्या साम्राज्याची समाप्ती करुन नवीन साम्राज्यांचा आरंभ हाच कृष्ण चरित्राला मानवी ताकदीचा विलास दाखविणारा भाग आहे. यामुळेच कृष्ण समाजाचा एक आदर्श नेता म्हणून लोकांसमोर उभा राहिलेला आहे.

येथूनच श्रीकृष्णाच्या कौतूकाच्या कहाण्या येण्याला सुरुवात झाली. पुढे तो देव, पूर्ण देव, परमेश्वर, तत्वज्ञानाचा प्रवक्ता, अनासक्त, वैराग्यशाली असे कृष्णाचे चरित्र वाढत गेले. कुरुंदकर म्हणतात. कृष्ण चरित्राचा काही" भाग काव्य या दृष्टीने बाजूला ठेवला, तरी कृष्ण एक अफाट कर्तृत्व असणाऱ्या, असामान्य संयम, अनासक्ती असणाऱ्या, असामान्य बुध्दीमता असणाऱ्या एका गणतंत्राचा निर्माता म्हणून प्राचीन इतिहासातील 'नेत्याचे' चित्र आहे. तर पाणिनी म्हणतात. "कि, "जूनी ऐतिहासिक माणसे कधीतरी लोकांना प्रीय होत इश्वरच होऊन जातात"."14 याचे चांगले उदा. म्हणजे कृष्ण व अर्जून यांना लोक देवाप्रमाणे पुजू लागले आहे. टप्या-टप्याने कृष्ण मानवामधून देवाकडे, परमेश्वराचा अंश नव्हे परमेश्वरच होत गेल्याचे दिसून येते. कुरुंदकर म्हणतात. कृष्णाचे खरे स्वरुप पाहण्यासाठी ख्रिस्तपूर्व 800 ते ख्रिस्तोत्तर 900 ते 1700 वर्षांचा प्रवास करावा लागेल. यामधून कृष्ण एका गणतंत्राचा नेता म्हणून पुढे येतो. जनतेचे राज्य निर्माण करणारा गणतंत्राचा नेता, तत्वज्ञानाचा प्रवक्ता असे अनेक कृष्णाचे चित्र दिसून येते. कृष्ण चरित्रातून काव्यात्मक भाग वगळला. तर कृष्ण एक राजकारणी नेता, एक राष्ट्रनिर्माता, राज्यनिर्माता म्हणून कृष्णाचे चित्र समोर येते. कृष्णाकडे देव या दृष्टीने न पाहता, प्राचीन काळातील एक शुर, पराक्रमी, आदर्श, राजकारपट्टु, राष्ट्रनिर्माता या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. म्हणजे कृष्णाच्या जीवनातील प्रत्येक घटनांचा ऐतिहासिक दृष्टीने विचार करावा हा नरहर कुरुंदकरांचा कृष्णविषयीच्या विवेचनाचा मुळ उद्देश आहे.

इ.स. 1962 मध्ये इरावती कर्वे यांनी महाभारतातील गांधारी या पात्रासंदर्भात लेख लिहिला होता. त्या लेखाचे परिक्षण कुरुंदकरांनी केले आहे. या परिक्षातून नहरहर कुरुंदकरांनी कर्वे यांचा दृष्टीकोण, गांधारीचे पुराण वाङ:मयातील चित्र व लोकमानसातील चित्र यावर प्रकाश टाकला आहे. गांधारीचे स्थान काय याविषयी चर्चा न होता गांधारीने डोळस असतांना डोळयास पट्टी का बांधली यावर जास्त चर्चा होत आलेली आहे. पतीला पाहून परपुरुषाबाबत मनात विपररीत विचार न येण्यासाठी गांधारीने डोळयाला पट्टी बांधली. कायमचे आंधळेपण स्विकारले.15 हे सत्य कारण होते का ? गांधारीला शंभर पुत्र झाले पण त्या बालकाचे मुख गांधारीने पाहिले नाही. इरावती कर्वेच्या मते 'गांधारी शंभर पुत्रांऐवजी शंभर दुःखांना प्रसवली आहे.'16 म्हणूनच तिने पुत्र जिवंत असेपर्यंत पट्टी सोडली नाही. धृतराष्ट्रही गांधारीला पट्टी सोडण्याचा आग्रह धरत नाही. धृतराष्ट्र पर्णकुटीजवळील चर्चेतून गांधारीस म्हणतो, "खरोखर, फार मोठी शिक्षा दिलीस गांधारी, कसली ती भयानक रात्र ? त्याच वेळी मी तूला मारुन का टाकले नाही ?"17 म्हणजे गांधारी-धृतराष्ट्र दोघेही एकमेकांशी सुडाच्याच भावनेने वागले. असे इरावती कर्वे यांनी 'युगांत' मध्ये नोंदविले आहे. यासंदर्भात कुरुंदकर म्हणतात कि, गांधारीच्या व्यक्तीमत्वामध्ये कर्वे यांना वर्तमान दिसून येतो. पुढे कुरुंदकर लिहितात कि, कर्वेच्या कल्पनेनूसार गांधारी ही एक पवित्रता स्त्री होती. तीने परपुरुषांशी वाईन विचार न येण्यासाठी पट्टी बांधली. असे जरी असले तरी विविध लेखकांच्या लिखाणातून गांधारीचे वेगवेगळे चित्र दिसून येते. कुरुंदकरांनी केलेल्या परिक्षणाद्वारे कर्वे यांनी गांधारीच्या जीवनाचा अर्थ सांगतांना गांधारीमध्ये कुठेतरी वर्तमान पाहत आहे असे दिसून येते. महाभारतातील गांधारीचा इरावती कर्वे वर्तमानकाळातील परिस्थितीशी अर्थ लावण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. असे कुरुंदकरांनी आपल्या विवेचनातून स्पष्ट केले आहे.

कर्णावर नाटक, कादंबरी, ललितलेखन अशाप्रकारे भरपूर लेखन झाले आहे. कर्णावरील लेखनाचे दोन भाग दिसतात. काहींना कर्ण दानशुर, पराक्रमी, दयाळु, सत्यवादी, तपस्वी, एकांतिक, मित्रनिष्ठ असा रेखाटला तर काहींनी कर्ण पापपुरुष, दुरात्मा, पुरुषाधम, अल्पचेतननीच, नित्यद्वेष्टा, क्रुर अशाप्रकारचा

रेखाटला. कर्णविषयी कुरुंदकरांचे चिंतन हे प्रत्यक्ष पक्षपाती किंवा विरोधक स्वरुपाच्या अशा कोणत्याही एका गटात बसणारे आहे. 'खरा कर्ण कोण' हे कुरुंदकरांनी आपल्या चिंतनातून स्पष्ट केले. प्रा. शुशिला पाटील यांच्या ग्रंथाला प्रस्थावना लिहितांनाविजय देशमुख यांच्या 'सुर्यपुत्र' या ग्रंथाचे परिक्षण करतांना कर्णाविषयीचे विवेचन कुरुंदकरांचे समोर आले आहे. कर्ण दलितांचा प्रतिनिधी नसून विधूर हा दलितांचा प्रतिनिधी आहे.[18] कर्ण एक सुर्यपुत्र आहे, कर्ण दलितांसाठी कधीच लढला नाही.[19] असे दाजी पणशीकरांनी 'खरा कर्ण कोण होता' या ग्रंथामध्ये नमूद केले आहे. दलितांचा प्रतिनिधी या नात्याने कर्णाचे व्यक्तीमत्व शून्य आहे. वर्तमान काळात लेखकांनी, नाटककरांनी, कादंबरीकारांनी हवा तसा कर्ण समोर आणला आहे. परंतू यामधून कर्णाचे खरे व्यक्तीमत्व दिसत नाही. असा अरोप कुरुंदकर करतांना दिसतात. कर्ण हा पहिला पांडव आहे. हे भीष्म विदुर, कुंती व कृष्ण यांना माहित असूनही हा मुद्दा कोणीच उपस्थित केला नाही. कर्ण पहिला पांडव आहे हे तत्कालीन जनमानसांना कळाले असते तर राजा कर्ण झाला असता व महाभारताचे युध्दीही टळले असते. कारण दुर्योधनास कर्ण राजा होणे गैर वाटणारे नव्हते. परंतू राजा कर्णाला न होऊ देता. राजा युर्धिष्ठिर व्हावा असा भीष्म, विदुर, कुंती व कृष्णाचा आग्रह होता.[20] या आग्रहमुळेच कुरुकुलाचा नाश केला असे कुरुंदकरांनी म्हटले आहे. काही लेखकांनी कर्ण दुर्देवी आहे असे म्हटले आहे. कुरुंदकरांनी दुर्देवीपणाचे निकस नोंदविले आहे. सर्व कविकल्पना सोडल्या तर ऐतिहासिकदृष्ट्या कर्ण नावाचा दुर्योधनाचा मित्र पराक्रमी राजा होता. तो युध्दात अर्जनाच्या हातून मारला गेला, एवढेच रंगशून्य गद्द, शाप आणि वर कल्पना सोडून दिल्यावर शिल्लक राहते. कुरुंदकर म्हणतात केवळ कर्णच दुर्देवी नाही तर दुर्देव महारभारतात सर्वांनाच कळवळून बसलेले आहे. कर्णाचे सरे दाण व तप तापसी असल्याने ता शकनात्याचा नयकही होऊ शकत नाही. कुरूंदकर म्हणतात 'भारतकारांनी दुर्योधन या पाप मन्युमयद्रमाचा कर्ण हा बुंधा मानलेला आहे.[21] कर्णाजवळ कोणताही उदात्त ध्येयवाद नाही. कर्णाचे खरे व्यक्तीमत्व द्रोपदी वस्त्रहरण प्रसंगी दिसुन येते. कारण द्रोपदीचे वस्त्र काढून घेण्याची सुचना कर्णाचीच आहे. कर्ण द्रोपदीला वेश्याही ठरवतो. याकडे मात्र कर्णाचे अनुकूल लेखन करणा-या लेखकांनी डोळेझाक केल्याचे दिसून येते. कर्ण या प्रसंगी असा का वागला याचा उलगडा कुरुंदकरांनी केला आहे. कुरुंदकर म्हणतात. द्रोपदी स्वयंवर हिणवून बोलली, कर्णाची हेटाळणी केली. म्हणून तो तसा वागला परंतू हे समर्थनीय नाही. उलट मनात राग धरुन वेळ आल्यावर फुत्कार सोडणारा कर्ण खुनशी मानुस ठरतो. कर्णाच्या मुत्यूकडे आत्मसमर्पण व बलिदानाच्या दृष्टीने पाहावे असाही एक गट आहे. या दृष्टीस कुरुंदकरांचा विरोध नाही परंतू यामुळे इतिहास आणि संस्कृतीचे प्रश्न निर्माण होतात.. "इतिहासातील कर्ण हा एक पराक्रमी यौध्दा दुर्योधनाच्या बाजूने होता. तो पांडवांचा वडील भाऊ होता. दुर्योधनाकडून लढतांना सतराव्या दिवशी मारला गेला. ऐवढेच सत्य शिल्लक राहते.[22] जन्मजात कवचकुंडलदान, ब्राम्हणांचे आणि परशुरामाचे महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीच्या आधारावर मांडलेले आहे. कर्णावर प्रेमाचा आरंभ ही सुध्दा एक ऐतिहासिक घटना आहे, कारण हा पहिला पांडव आहे. हेच खरे कर्ण प्रेमाच्या आरंभाचे आधारस्तंभ आहे. पांडव श्रेष्ठ म्हणून कर्णाचे उदात्तीकरण सुरु होते. तर दुर्योधन अधिक पापी व दृष्ठ रंगविला जातो. खरे म्हणजे कर्णाचे विरोधक सांस्कृतिक दृष्टी आणि ऐतिहासिकदृष्टी यात घोटाळा करतात. विविध लेखनामधून कर्णाचे व्यक्तीचित्र बदलत गेले. भासांचा कर्ण वेगळाच दिसतो. कलावंत आपणास हवी तशी नवनिर्मिती करत असतो त्यावर बंधने असली पाहिजे. तरच वस्तुनिष्ठ कर्ण समोर येईल. कुरुंदकरांनी महाभारतातून कर्णाचा इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळेच त्यांच्या इतिहासलेखनास महत्व प्राप्त होते.

शकुंतला मुळ सुरुवात महाभारताच्या आदी पर्वात ६८ व्या अध्यायापासून ते ७४ व्या अध्यायापर्यंत हे कथानक पूर्ण होते. शकुतला म्हटले की सर्व भारतीयांचे मन गर्वोन्नत व प्रसन्न होते. याचे सर्व श्रेय कालीदासाचे आहे. कारण कालीदासाने शकुंतला ही प्रमाणिक लाजाळू, पतिवृत्ता अशाप्रकारची रंगविली आहे. तर महाभारतामध्ये शकुंतला ही गरीब, बिचारी, भोळी रंगवून विलासी, बेजबाबदार दुष्यंतने तीच्या भोळेपणाचा गैरायदा घेतला असे कथानक आहे.[23] पौराणिकांनी तर दुष्यंत व शकुंतलेला वंदनीय करुन टाकले आहे.

'मागोवा' या ग्रंथामध्ये कुरूंदकरांनी पुराणातील, काव्यातील शकुंतलेचे चित्र समोर ठेवून वस्तूनिष्ठ इतिहास समोर आणला आहे. शकुंतलेचे मुळ अख्यान हे ऐतिहासिक असल्याने प्रत्येकाने इतिहासाकाराच्या चिकित्सक दृष्टीने 'शकुंतल' या कथेकडे पाहिले पाहिजे. याकडे ते निर्देश करतात. कालीदासाच्या शकुंतल या नाटकाबाबत कुरुंदकर म्हणतात. काव्यात्मकदृष्ट्या हे नाटक अप्रतिमा अव्दित्य आहे. परंतू इतिहास या नाटकात शून्य आहे.[24] संवादशैली, काव्यमयता, नाट्यमयता या बाबी कालिदासाच्याच आहेत, पण कथानक त्यातील प्रसंग हेही कालीदासाचे स्वतंत्र आहे. याशिवाय स्वभारवरेखाही नव्याने निर्माण केलेल्या दिसून येतात. अशा परिस्थितित केवळ दृष्यंत, कण्व, शकुंतला, ही नावे तेवढी भारतीय शिल्लक राहतात. उरलेले सर्व कालीदासाची निर्मिती आहे हेच स्पष्ट होते. खरे म्हणजे कालीदास काव्य लिहित होता. पुराणात सुतांनी संग्रहित केलेला इतिहास समाविष्ट होता.[25] हे आपण समजून घेतले पाहिजे, असा मुद्दा कुरंदकर मांडतात. पौराणिकांच्या लिखानावरुन एक विलासी राजा व त्याच्या कामुकतेचा फायदा घेउन आपला पुत्र युवराज करु इच्छिणारी, संसारात रस नसणारी शकुंतला, असेच स्वरुप शकुंतलेचे दिसुन येते. परंतू इतिहास हा वेगळा आहे. इतिहासातील शकुंतलेचे स्थान स्पष्ट करतांना कुरुंदकर म्हणतात तुर्वसूच्या आधारे पौरवांच वैभव निर्माण करणारा दृष्यंत व त्याच्या विरुध्द उभे राहिलेले तुर्वसू व कण्व यांच्या संघर्षाचा हा इतिहास आहे. यामध्ये शेवटचा विजय आपल्या राजकीय हेतूसाठी वापरले. हेच सुतांनी संग्रहित केलेल्या संग्रहावरुन सिध्द होते. अशाप्रकारे शकुंतलेचे इतिहासातील वास्तविक स्थान कुरुंदकर स्पष्ट करतात.

महाभारत कसे वाचावे, महाभारताचा विचार कशा पध्दीने करावा याचे मापदंड कुरुंदकरांनी आपल्या महाभारताविषयक विवेचनातून मांडले आहे. महाभारत वाचतांनी एक तात्विक बैठक ठरवून वाचले पाहिजे असाही विचार ते मांडतात. महाभारताचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करण्यासाठी पाच बाबी त्यांनी सांगितल्या आहेत. एक- पुरानातील पात्रांचे स्थान शोधले पाहिजे. दोन- उदात्तिकरण, अमानवी घटनेला दुय्यम स्थान देऊन व्यक्तींची खरी मानवीयता गृहित धरली पाहिजे. तीन- असंभवनीय भाग बाजूला सोडला पाहिजे. चार-मुळ वर्णस्थळे नीट हेरुन स्थानांची चौकट बाजूला सारली पाहिजे, चार-मुळ वर्णस्थळे नीट हेरुन स्थानांची चौकट बाजूला सारली पाहिजे आणि पाच- सपूंर्ण कथानकाचा मुळ दृष्टीकोणातून विचार केला पाहिजे.[26]महाभारताविषयी चर्चा सर्व बाजूनी चालू असावी. एकच विचार एका घटनेसंबंधी नसून वेगवेगळे विचार यावे, यामधून समाज गतिमान व्हावा, समाजाचा जीवंतपणा व समृध्दी व्हावी हाच नरहर कुरुंदकरांचा प्रमुख उद्देश असावा असे म्हणणे अयोग्य होणार नाही.

**सारांश**

व्यासांच्या नावावर मोडणारा, सूत संस्कृतीचा कथाभाग, मात्र संस्कृतीने पचविलेला असा महाभारत ग्रंथ आहे. महाभारत वाचतांनी नरहर कुरुंदकरांनी त्यामधून इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला आहे. सोबतच भारतीय संस्कृतीचे रुप व संस्कृतीची विविधताही ते महाभारतात शोधतात. तसेच भारतीय संस्कृतीक कसे परिवर्तन झाले याविषयीचे अनेक प्रश्नही कुरुंदकर महाभारतातू शोधतांना दिसतात. कुरुंदकरांनी केलेल्या महाभारताविषयक लिखानावरून त्यांनी महाभारताकडे धर्मश्रध्देने पाहिले असे दिसत नाही. तर त्यांनी महाभारताकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहिले आहे. महाभारत हे व्यासांचे वैभवशाली शिल्प आहे. ते एक राष्ट्रीय संचित आहे. धर्मस्थापना हे महाभारताचे एक सुत्र आहे. अशा अनेक बाबींचे अविष्कार त्यांच्या महाभारत विषयक लिखानातून दिसून येतात. महाभारतातील व्यक्ती-पात्राविषयक लेखनामध्ये त्यांनी ययाती, भीष्म, गांधारी, कर्ण, शकुंतला, दुष्यंम यांचे लोकमानसातील व वास्तविक चित्र काय? याचे अतिशय मार्मिक पध्दतीने विश्लेषन केले आहे. महाभारत ही कथा जेवढी काल्पनिक आहे, तेवढेच त्यामध्ये अतिशयोगक्तीचे, प्रेक्षपाचे प्रमाण जास्त आहे. अशा पध्दतीने नरहर कुरुंदकरांनी महाकाव्याची व्यापक चर्चा केली आहे. कुरुंदकरांनी महाभारतास इतिवृत्त, आखयायिका आणि धर्मकथांचा संग्रह असे मानले आहे. महाभारताकडे कुरुंदकरांनी जातककथा आणि हिंदूचे सर्व प्राचीन वाङ्:मय याचा अन्वय लावयाचा दृष्टीकोणातून पाहिले आहे. कुरुंदकर महाभारताचा अभ्यास करतांना काटेकोरपणे घटनांचा तपशील पडताळून पाहिल्यानंतर संदर्भ व पुराव्याच्या आधारावर सत्यशोधनाचा प्रयत्न करायचे.

**संदर्भ सूची**

1. कुरुंदकर नरहर, जूलै 1996. यात्रा : नांदेड. अभय प्रकाशन, द्वि.आ., पृ.9
2. सारडा शंकर (संपा.), 2002. व्यासांचे शिल्प : पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पृ.6
3. रसाळ सुधिर (संपा.), जानेवारी. कै. नरहर कुरुंदकर विशेषांक : प्रतिष्ठाण, पृ.114
4. पणशीकर दाजी, 1998. महाभारत एक सुडाचा प्रवास : पुणे. रविराज प्रकाशन, आ.7वी, पृ.44
5. सारडा शंकर (संपा.), महाभारत एक सुडाचा प्रवास : पुणे. रविराज प्रकाशनय, पृ.12-30
6. कुरुंदकर नरहर, 1978. ओळख : औरंगाबाद. साहित्य साधन प्रकाशन, पृ.10
7. कुरुंदकर नरहर, 1978. ओळख : औरंगाबाद. साहित्य साधन प्रकाशन, पृ.18
8. सारडा शंकर, 1978. व्यासांचे शिल्प, कुरुंदकर नरहर, ओळख : औरंगाबाद. साहित्य साधना प्रकाशन, पृ.128
9. कुरुंदकर नरहर, 1978. ओळख : औरंगाबाद साहित्य साधन प्रकाशन, पृ.19
10. सारडा शंकर, 1978. व्यासांचे शिल्प, कुरुंदकर नरहर, ओळख : औरंगाबाद. साहित्य साधना प्रकाशन, पृ.148
11. भगत दत्ता, 1987. वाडीकर भू.द. भंते यदुनाथ : पुणे. इंद्रायणी साहित्य, जुलै, पृ.45
12. भिडे श्रीपाद रघुनाथ, महाभारताची शपथवाणी : पुणे. अमेय साहित्य प्रकाशन, पृ.41-49
13. सारडा शंकर, व्यासांचे शिल्प,महाभारताची शपथवाणी : पुणे. अमेय साहित्य प्रकाशन, पृ.173
14. सारडा शंकर, व्यासांचे शिल्प, महाभारताची शपथवाणी : पुणे. अमेय साहित्य प्रकाशन, पृ.190
15. बोरकर श्रीराम, 2005. कृ. गांधारी तू पट्टी सोड : दादर. मुंबई, मनोरमा प्रकाशन, पृ.170

16. सारडा शंकर, 2005. व्यासांचे शिल्प, गांधारी तू पट्टी सोड : दादर. मुंबई, मनोरमा प्रकाशन, पृ.248
17. कर्वे इरावती, 2004. युगांत : पुणे. देशमुख आणि देशमुख कंपनी पब्लीशर्स, पृ.23-24
18. सारडा शंकर, 2004. व्यासांचे शिल्प, युगांत : पुणे. देशमुख आणि देशमुख कंपनी पब्लीशर्स, पृ.217
19. पणशीकर दाजी, 1992. खरा कर्ण कोण होता : पुणे. रविराज प्रकाशन, पृ.7
20. कुरुंदकर नरहर, 1992. ओळख, खरा कर्ण कोण होता : औरंगाबाद. पुणे रविराज प्रकाशन पृ.41-41
21. सारडा शंकर, 1992. व्यासांचे शिल्प, ओळख, खरा कर्ण कोण होता : औरंगाबाद. पुणे रविराज प्रकाशन, पृ.218
22. कुरुंदकर नरहर, 1992. ओळख, खरा कर्ण कोण होता :औरंगाबाद. पुणे रविराज प्रकाशन, पृ.51
23. नरहर कुरुंदकर, 1967. ‘मागोवा’: पुणे. देशमुख आणि देशमुख कंपनी पब्लिशर्स, पृ.53
24. नरहर कुरुंदकर, 1967. ‘मागोवा’: पुणे. देशमुख आणि देशमुख कंपनी पब्लिशर्स, पृ.76-77
25. रसाळ सुधीर, (संपा.) जानेवारी 1985. कै. नरहर कुरुंदकर विशेषांक : प्रतिष्ठान, पृ.119
26. कुरुंदकर नरहर, 2000. भजन : पुणे. इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पृ.23